RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ५२] मंगळवार, एप्रिल २१, २०२६/वैशाख १, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १७७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग,

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२. दिनांकः २१ एप्रिल,२०२६.

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक : शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/रवका-१.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६६ च्या खंड (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमांस, महाराष्ट्र शासन कार्यनियमावली (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीला जोडलेल्या पहिल्या अनुसूचीमध्ये,-

(क) "शासनाचे विभाग" या शीर्षांखालील, अनुक्रमांक ३४ येथील नोंदी नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईलः-

"३५. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग";

(ख) "१.सामान्य प्रशासन विभागाला नेमून दिलेले विषय" या शीर्षाखालील

(एक) "तीनः माहिती तंत्रज्ञान व प्रशासकीय सुधारणा", या उपशीर्षाऐवजी पुढील उपशीर्ष दाखल करण्यात येईलः- "तीन प्रशासकीय सुधारणा,";

(दोन) "माहिती तंत्रज्ञान व संबंधित बाबी" याच्याशी संबंधीत असणारी नोंद ६६-क वगळण्यात येईल;

(ग) पहिल्या अनुसूचीच्या शेवटी, पुढील शीर्ष व नोंदी जादा दाखल करण्यात येतीलः-

"३५. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागास नेमून दिलेले विषय."

१. सर्वसाधारण धोरणात्मक बाबी.-

(क) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (ITeS) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांतील धोरणे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी व पुनर्विलोकन करण्याशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी.

(ख) क्वांटम संगणन (Quantum Computing), उदयोन्मुख तंत्रज्ञान, मानवरहित प्रणाली, डीप-टेक, एआर/व्हीआर (AR/VR) आणि विदा केंद्रे (डेटा सेंटर्स) यांच्याशी संबंधित असणारी धोरणे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी व पुनर्विलोकन करण्याशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी.

(ग) डिजिटल महाराष्ट्र उपक्रम व शासनाचे संपूर्ण डिजिटल परिवर्तन यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व धोरणात्मक बाबी.

(घ) डिजिटल शासनाचे मानकीकरण, आराखडे व मार्गदर्शक तत्त्वे यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी.

२. ई-शासन (ई-गव्हर्नन्स).-

(क) राज्य शासनाच्या सर्व विभागांतील ई-शासन उपक्रमांचे प्रचालन, समन्वयन व अंमलबजावणी.

(ख) नागरिक सेवा वितरणासाठी प्लॅटफॉर्म व पोर्टल्सचा विकास, कार्यचालन व परिरक्षण.

(ग) व्यवसाय प्रक्रिया पुनर्रचना व शासकीय सेवांचे डिजिटायझेशन.

(घ) सेवांचे इलेक्ट्रॉनिक वितरण व डिजिटल अधिप्रमाणन प्रणाली यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबी.

(ड.) राज्य शासनाच्या सर्व विभागांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

३. माहिती तंत्रज्ञान.-

(क) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान - सहाय्यभूत सेवा (IT व ITes) उद्योगांचे प्रचालन व विकास.

(ख) आयटी पार्कस्, आयटी केंद्रे (हब) व माहिती तंत्रज्ञान समूहाची (आयटी क्लस्टर्स) स्थापना व विनियमन.

(ग) आयटी क्षेत्रातील गुंतवणूक प्रोत्साहन, प्रोत्साहन योजना व सुलभता.

(घ) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवोद्योगांचे (स्टार्टअप्स) व उद्योजकतेचे प्रचालन.

४. विज्ञान व तंत्रज्ञान.-

(क) राज्यातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील धोरणे, नवीन शोध, संशोधन व विकास, सहयोग, क्षमता बांधणी, योजना, प्रोत्साहने इत्यादींशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी.

५. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र.-

(क) इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचे व उद्योगांचे प्रचालन व विकास.

(ख) सेमीकंडक्टर व संलग्न परिसंस्थेचा विकास.

(ग) इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रासाठी प्रोत्साहने, योजना व सुलभता.

६. कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञान.-

(क) कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित असणाऱ्या धोरणांची निर्मिती व अंमलबजावणी

(ख) शासन व सार्वजनिक सेवा वितरणामध्ये एआय चे प्रचालन व वापर.

(ग) इंटरनेट ऑफ थिंग्स, ब्लॉकचेन, क्वांटम संगणन, ऑगमेंटेड रिअॅलिटी व व्हर्च्युअल रिॲलिटी यांसह उदयोन्मुख तंत्रज्ञानांचा विकास व प्रचालन.

(घ) कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात उत्कृष्टता केंद्रे, नवोपक्रम केंद्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) गुंतवणूक प्रदेश व संशोधन भागीदारींची संस्था स्थापना.

(ड.) कृत्रिम बुद्धिमत्तेचा नैतिक, सुरक्षित व जबाबदार वापर.

७. सायबर सुरक्षा आणि विदा (डेटा) संरक्षण.-

(क) राज्यासाठी सायबर सुरक्षा धोरणे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे

(ख) शासकीय माहिती तंत्रज्ञान प्रणालींसाठी सुरक्षा मानके, परीनिरीक्षण व अनुपालन.

(ग) विदा (डेटा) संरक्षण, गोपनीयता व नियमन चौकट.

८. डिजिटल पायाभूत सुविधा.-

(क) राज्य माहिती विदा केंद्रे (डेटा सेंटर) व क्लाउड पायाभूत सुविधांची स्थापना,कार्यसंचालन व परिक्षण.

(ख) नेटवर्क व संलग्न संदेशवहन व पायाभूत सुविधांची स्थापना.

(ग) भारतनेटसह ब्रॉडबैंड व डिजिटल कनेक्टिव्हिटी उपक्रमांचा समन्वय.

(घ) ५G सहित पुढील पिढीच्या संदेशवहन तंत्रज्ञानांचे प्रचालन.

९.नवीन शोध, नव उद्योग (स्टार्टअप्स) आणि नवसंशोधन (इनक्युबेशन).-

(क) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता (आयटी व एआय) क्षेत्रांमध्ये नवीन शोध व नवउद्योग (स्टार्टअप) परिसंस्थेचे प्रचालन करणे.

(ख) इनक्युबेटर्स, ॲक्सेलरेटर्स व नवसंशोधन केंद्रांची स्थापना व त्यांना सहाय्य करणे.

(ग) शैक्षणिक संस्था, उद्योग व संशोधन संस्थांशी सहयोग.

(घ) निधी व उपक्रम सहाय्यकारी (व्हेंचर सपोट) यंत्रणांची सुलभता.

१०. क्षमता विकास व डिजिटल साक्षरता.-

(क) शासकीय अधिकाऱ्यांना आयटी, उदयोन्मुख तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता यामधील प्रशिक्षण देणे व क्षमता बांधणी करणे.

(ख) नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता व जनजागृती कार्यक्रम.

(ग) शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थांसह सहयोगाने कौशल्य विकास उपक्रम.

११. विनियमनकारी व कायदेशीर बाबी.-

(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २), दूरसंचार अधिनियम, डिजिटल व्यक्तिगत विदा (डेटा) संरक्षण अधिनियम, २०२३ (२०२३ चा २२) आणि डिजिटल व्यक्तिगत विदा (डेटा) संरक्षण नियम यांची अंमलबजावणी

(ख) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमता (एआय) व विदा (डेटा) प्रशासनाशी संबंधित असणारे राष्ट्रीय कायदे व धोरणे यांचे अनुपालन.

१२. सार्वजनिक-खाजगी भागीदारी.-

(क) आयटी, इलेक्ट्रॉनिक्स, उदयोन्मुख तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता (एआय) क्षेत्रांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल्सची निर्मिती व अंमलबजावणी.

(ख) माहिती तंत्रज्ञान प्रकल्प, इत्यादींसाठी विक्रेता नामिका, प्रकल्प संरचना व करार व्यवस्थापन.

(ग) खाजगी क्षेत्रातील संस्था व आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याशी सहयोग.

१३. संनियंत्रण, मूल्यमापन व लेखापरीक्षण.-

(क) माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व कृत्रिम बुद्धिमता (एआय) व प्रकल्पांचे व योजनांचे संनियंत्रण व मूल्यमापन

(ख) माहिती तंत्रज्ञान व उदयोन्मुख तंत्रज्ञान संबधित प्रकल्पांचे कामगिरी मूल्यनिर्धारण, परिनिरीक्षण व प्रभाव विश्लेषण.

(ग) डॅशबोर्डस व प्रमुख कामगिरी निर्देशांक यांचा विकास.

१४. समन्वय व प्रसार.-

(क) भारत सरकारशी आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयासह त्याच्या इतर मंत्रालयांशी किंवा विभागांशी समन्वय.

(ख) राज्य शासनातील आंतर-विभागीय समन्वय.

(ग) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, उदयोन्मुख तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमता (एआय) क्वांटम संगणन, डीप-टेक, इत्यादी क्षेत्रांमधील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघटनांशी सहयोग.

(घ) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमता (एआय) व उदयोन्मुख तंत्रज्ञान यांच्याशी संबंधित असणाऱ्या विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच त्यात सहभाग घेणे.

१५. आर्थिक व प्रशासकीय बाबी.-

(क) विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व प्रशासकीय बाबी.

(ख) विभागाशी संबंधित असणारे अर्थसंकल्प, वित्तीय मान्यता व खर्च नियंत्रण.

(ग) विहित कार्यपद्धतीनुसार माहिती तंत्रज्ञान वस्तू व सेवांचे प्रापण.

(घ) विभागाच्या अंतर्गत असलेली व दुय्यम कार्यालये, महामंडळे, संस्था, आयोग व स्वायत्त संस्थांवर यांवरील प्रशासकीय नियंत्रण.

१६. अवशिष्ट बाबी

वर नमूद न केलेल्या (आणि इतर कोणत्याही विभागाला विशेष करून नेमून न दिलेल्या) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, उदयोन्मुख तंत्रज्ञान यांच्याशी संबंधित असणाऱ्या इतर सर्व बाबी."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश अग्रवाल,
शासनाचे मुख्य सचिव.

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,

Mantralaya, Madame Cama Marg, Hutatma Rajguru Chowk ,Mumbai 400 032
Dated 21st April, 2026.

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No.ROB-2026/C.R.20/O&M-1.—In exercise of the powers conferred by clause (3) of article 166 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Government Rules of Business as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Government Rules of Business (Amendment) Rules, 2026.

2. In the FIRST SCHEDULE appended to the Maharashtra Government Rules of Business, —

(*a*) under the heading "DEPARTMENTS OF GOVERNMENT", after entry at serial number 34, the following entry shall be added, namely:-

"35. Electronics, Information Technology and Artificial Intelligence Department";

(*b*) under the heading "1. Subjects allotted to General Administration Department,-

(i) for the sub-heading "III Information Technology and Administrative Reforms." the following sub-heading shall be substituted, namely:-

"III. Administrative Reforms,"

(ii) entry 66-A relating to "Information Technology and related matters", shall be deleted;

(c) at the end of the FIRST SCHEDULE, the following heading and entries shall be added namely:-

"35. Subjects allotted to the Electronics, Information Technology and Artificial Intelligence Department

1. General Policy Matters

(a) All matters relating to formulation, implementation and review of policies in the domain of Electronics, Information Technology and Information Technology enabled Service (ITeS) and Artificial Intelligence.

(b) All matters related to formulation, implementation and review of policies relating to the Quantum Computing, Emerging Technologies, Unmanned Systems, Deep-Tech, AR/VR and Data Centres.

(c) All policy matters related to Digital Maharashtra initiatives and overall digital transformation of governance.

(d) All matters relating to standardization, frameworks and guidelines for digital governance.

2. E-Governance

(a) Promotion, coordination and implementation of e-Governance initiatives in all Departments of the State Government.

(b) Development, operation and maintenance of citizen service delivery platforms and portals.

(c) Business Process Re-engineering and digitisation of government services.

(d) Matters relating to electronic delivery of services and digital authentication systems.

(e) Providing Technical Guidance to all Departments of the State Government.

3. Information Technology

(a) Promotion and development of Information Technology and IT-enabled services (IT and ITeS) industries.

(b) Establishment and regulation of IT Parks, Hubs and Information Technology clusters.

(c) Investment promotion, incentives and facilitation in IT sector.

(d) Promotion of startups and entrepreneurship in Information Technology Sector.

4. Science and **Technology**

(*a*) All the matters related to the policies, innovations, Research and Development, Collaborations, Capacity Building, Schemes, Incentives etc. under the domain of Science and Technology in the State.

5. Electronics Sector

(a) Promotion and development of electronics sector and industry.

(b) Semiconductor and allied ecosystem development.

(c) Incentives, schemes and facilitation for Electronics sector.

6. Artificial Intelligence and **Emerging Technologies**

(a) Policy formulation and implementation relating to Artificial Intelligence.

(b) Promotion and adoption of AI in governance and public service delivery.

(c) Development and promotion of emerging technologies including Internet of Things, Blockchain, Quantum Computing, Augmented Reality and Virtual Reality.

(d) Establishment of Centres of Excellence, Innovation Hubs, AI Investment Regions and Research Partnerships in AI and Emerging Technologies.

(e) Ethical, safe and responsible use of Artificial Intelligence.

7. Cyber Security and **Data Protection**

(a) Formulation and implementation of cyber security policies for the State.

(b) Security standards, audits and compliance for government IT systems.

(c) Data protection, privacy and governance frameworks.

8. Digital Infrastructure

(a) Establishment, operation and maintenance of State Data Centres and cloud infrastructure.

(b) Establishment of Network and allied communication infrastructure.

(c) Coordination of broadband and digital connectivity initiatives including BharatNet.

(d) Promotion of next generation communication technologies including 5G.

9. Innovation, Startups and **Incubation**

(a) Promotion of innovation and startup ecosystem in Electronics, IT and AI sectors.

(b) Establishment and support of incubators, accelerators and innovation centres.

(c) Collaboration with academic institutions, industry and research organizations.

(d) Facilitation of funding and venture support mechanisms.

10. Capacity Building and **Digital Literacy**

(a) Training and capacity building of the Government officials in IT, Emerging Technologies and AI.

(b) Digital literacy and awareness programmes for citizens.

(c) Skill development initiatives in collaboration with academic and training institutions.

11. Regulatory and **Legal Matters**

(a) Implementation of Information Technology Act, 2000 (2 of 2000), Telecommunication Act, Digital Personal Data Protection Act, 2023 (22 of 2023) (DPDP Act) and the Digital Personal Data Protection Rules (DPDP Rules).

(b) Compliance with national laws and policies relating to Electronics, Information Technology, AI and Data Governance.

12. Public-Private Partnerships

(a) Formulation and implementation of Public-Private Partnership models in IT, Electronics, Emerging Technologies and AI sectors.

(b) Vendor empanelment, project structuring and contract management for technology projects, etc.

(c) Collaboration with private sector entities and international organizations.

13. Monitoring, Evaluation and **Audit**

(a) Monitoring and evaluation of IT, Electronics and AI projects and schemes.

(b) Performance assessment, audits and impact evaluation of IT and Emerging Technology Projects.

(c) Development of dashboards and key performance indicators.

14. Coordination and **Outreach**

(a) Coordination with Government of India and its Ministries or Departments including Ministry of Electronics and Information Technology.

(b) Inter-departmental coordination within the State Government.

(c) Collaboration with national and international organizations in the sectors of Electronics, Information Technology, Emerging Technologies, Artificial Intelligence, Quantum Computing, Deep-Tech etc.

(d) Organize as well as participate in various National and International events related to the Electronics, Information Technology, Artificial Intelligence and Emerging Technology.

15. Financial and **Administrative Matters**

(a) All Administrative matters related to the Department.

(b) Budgeting, financial approvals and expenditure control relating to the Department.

(c) Procurement of IT goods and services in accordance with prescribed procedures.

(d) Administrative control over attached and subordinate offices, corporations, societies, commissions and autonomous bodies under the Department.

16. Residual Matters

All other matters relating to Electronics, Information Technology ,Artificial Intelligence, Emerging Technologies and Science and Technology not mentioned above (*and not specifically allocated to any other department).*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.